म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. बा. वा.



# वित्रीची गोष्ट

IRBK-0106941

देवादिकांच्या गोष्टी : ५

# वट-सावित्रीची गोष्ट

लेखक : अमरेन्द्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग २३३६५
१।६।५८
नों. दि. ३१।६।५८
वाचनालय शाखा

पस्तीस नये पैसे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि ..............
वि. ...... क्र. ..................

IRBK-0106941

वोरा ॲन्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि.,
मुंबई नं. २.

प्रकाशक :
एम. के. वोरा,
वोरा अ‍ॅण्ड कं.पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड,
राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

✦

लेखक :
अमरेन्द्र

✦

आवृत्ति पहिली
किंमत ३५ नये पैसे
पानें २०

✦


प्रसिद्धी :
वटपौर्णिमा
शके १८८०

✦

पुस्तक सहावें

✦

मुद्रक :
अ. चिं. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ,
पुणें २.



सावित्रीच्या स्मरणाचा हा दिवस.

सावित्री म्हणजे साक्षात् धैर्याची मूर्ति, बुद्धीची बिजली आणि चिकाटीची चमत्कृति.


ज्येष्ठ महिन्यांतली पौर्णिमा लक्षांत येते ना तुमच्या ? धो धो पाऊस कोसळत असतो. विजा चमकत असतात. ढगांच्या गडगडाटानें कानठळ्या बसत असतात. आणि अशा पौर्णिमेला चंद्राचें चांदणें पारखें असतें. काळाकुट्ट अंधाराची रात्र येते. त्यावेळीं घोर अरण्यांत प्रत्यक्ष मृत्यूशीं बोलत उभी राहणारी निधड्या छातीची सावित्री. पतिप्रेमासाठीं प्रिय प्राणांचीहि पर्वा न करणारी सावित्री. आपल्या कुशाग्र बुद्धीच्या बळावर देवालाहि चकविणारी सावित्री. अशा अनेक सद्गुणांनीं संपन्न असलेल्या सावित्रीची ही स्मृति आहे. तिला आत्मिक बळ, आत्मविश्वास देणारें तें व्रत; आणि तो धीरोदात्त प्रसंग ज्या स्थळीं घटला तो वटवृक्ष; सारें सारें अजरामर झालेलें आहे.

२३३२९
आळंदी
२८९

* * * * * * * * *

# वट-सावित्रीची गोष्ट

* * * * * * * * *



## सावित्रीचें स्वयंवर

रथ वेगांत धांवत होता. त्यांत बसलीं होतीं दोघेंजणें. एक होती राजकन्या. दिसायला फार सुंदर. वागायला अतिच चांगली. तिचें नांव होतें सावित्री. ही मद्रदेशाच्या अश्वपति राजाची मुलगी. रथांत दुसरा बसला होता तो म्हातारा अश्वपति राजाचा प्रधान.

कुठे चाललीं होतीं हीं दोघेंजणें ?

तीं चाललीं होतीं सावित्रीसाठीं नवरा शोधायला. पूर्वी अशी पद्धत असे. राजकन्या आपला पति आपणच निवडी. त्याला म्हणत

स्वयंवर. स्वयं म्हणजे स्वतः. वर म्हणजे पति किंवा नवरा. लग्नाला योग्य झालेल्या मुलीनें स्वतःसाठीं स्वतःचा पति पसंत करणें, निवडणें म्हणजे स्वयंवर.

सावित्री अश्वपति राजाची एकुलती एक मुलगी होती. त्यामुळें ती त्याची फार आवडती होती. आणि ती त्याला मिळाली होती तीहि मोठ्या नवसासायासानें. राजानें त्याकरितां खूप तप केलें होतें. ' सावित्री ' या देवतेच्या नांवाचा वर्षेंच्या वर्षें जप केला होता. तेव्हां सावित्री प्रसन्न झाली. तिनें राजाला वर दिला : " तुला मुलगी होईल आणि ती माहेर-सासरच्या दोन्ही कुळांचा उद्धार करील. तसेंच ती माझ्या नांवानेंच प्रसिद्ध होईल. " त्याप्रमाणें राजाला मुलगी झाली. म्हणून राजानें आनंदानें तिचें नांवहि ठेवलें ' वरदा सावित्री. '

सावित्री फारच सुंदर होती. अतिशय गुणी होती. ती हळूहळू वयानें मोठी झाली. लग्न करण्याइतकी मोठी झाली. पण तिच्यायोग्य असा वर कोणी आढळेचना. त्यामुळें राजा मोठ्या काळजींत पडला. मग त्यानें सावित्रीला जवळ बोलाविलें. आणि सांगितलें, " बाळ, मला तर तुझ्यायोग्य वर कोणी दिसत नाहीं. तेव्हां तूंच तुझा वर शोधून काढ. तो चांगल्या कुळाचा व उत्तम शीलाचा असला म्हणजे झालें. " सावित्री शहाणी नि हुषार होती. तिनें वडिलांची काळजी जाणली. ती म्हणाली, " बाबा, तुम्ही मुळीच काळजी करूं नका. माझा पति मीच निवडतें. "

लगेच राजानें तिला पति निवडण्यासाठीं पाठवावयाचें ठरविलें. त्याकरितां तिला निरनिराळ्या राज्यांत जावें लागणार होतें. तिच्या-बरोबर कोणीतरी विश्वासू माणूस द्यायला हवें होतें. राजानें आपल्या म्हाताऱ्या अनुभवी प्रधानाला तिच्याबरोबर पाठवावयाचें ठरविलें.

सोन्याचा रथ शृंगारला. सावित्रीनें आईवडिलांचे आशीर्वाद घेतले. प्रधान तिच्या सोबतीसाठीं निघाला. आणि सारथ्यानें रथ भरधांव सोडला.

✦ ✦ ✦

## द्युमत्सेनाच्या आश्रमांत

सावित्री अनेक राज्यांत गेली. तिनें पुष्कळ राजपुत्र पाहिले. खूप ठिकाणें बघितलीं. कितीतरी तरुणांचा तिनें विचार केला. परंतु पति म्हणून कोणीच तिच्या पसंतीला येईना. आपल्याला हा योग्य वर आहे असें तिला वाटेना.

तरीपण पति हा निवडलाच पाहिजे. त्याशिवाय ती कशी परत जाणार ? सावित्रीचा रथ एका दाट अरण्यांतून चालला होता. आपल्याला योग्य पति कसा मिळणार हाच विचार तिच्या मनांत चाललेला होता. म्हाताऱ्या प्रधानालाहि तीच काळजी लागली होती. सावित्रीसाठीं वर न निवडतांच राजाकडे परत जाणें त्याला बरें वाटत नव्हतें.

इतक्यांत त्या प्रधानाचें लक्ष बाहेर गेलें. त्याला तो प्रदेश ओळखीचा वाटला. त्यानें सारथ्याला एकदम रथ थांबवायला सांगितलें.

" सावित्री, इथे आपण थोडा वेळ थांबूं. या अरण्यांत एक थोर पुरुष राहतो त्याची भेट घेऊं. त्याची खुशाली विचारूं. आणि मग जाऊं पुढें, " प्रधान म्हणाला.

सावित्रीहि सतत चाललेल्या प्रवासाला कंटाळलीच होती. तिलाहि तो बेत पसंत पडला. पण तिनें विचारलें, " मंत्रीवर, कोण राहतें या घनदाट अरण्यांत ? इथे तर माणसांची वस्ती आहे असेंसुद्धां वाटत नाहीं. "

" राजकन्ये, बरोबर आहे तुझें म्हणणें, " प्रधान रथांतून खालीं उतरत सांगूं लागला, " आपल्या मद्रदेशाप्रमाणेंच शाल्व म्हणून देश आहे. तिथला राजा द्युमत्सेन. नेहमीं धर्मानें वागणारा. मोठा थोर पुरुष. पण बिचारा आंधळा झाला. तेव्हां त्याचें राज्य शत्रूंनीं हिसकावून घेतलें. त्याला आणि त्याच्या राणीलाहि राज्यांतून हांकून लावलें. तीं दोघें बिचारीं इथे येऊन राहिलीं आहेत. आतां तीं म्हातारीं झालीं असतील अगदीं. मला चांगली माहिती आहे त्यांची."

" हीं दोघें म्हातारीं आहेत म्हणतां ! " कनवाळू सावित्रीनें कळवळून विचारलें, " मग त्यांची सेवाचाकरी कोण करतें ? त्यांना खायला-जेवायला कोण आणून देतें ? "

" कां ? त्यांचा तरुण मुलगा आहे कीं. त्याचें नांव सत्यवान. तोहि मोठा गुणी मुलगा आहे. आणि दिसायलाहि मोठा सुरेख आहे म्हणतात. " प्रधानानें माहिती सांगितली.

मग मात्र सावित्रीच्या मनांत निराळेच विचार सुरू झाले. ' इतक्या ठिकाणीं आपण हिंडलों. इतके राजपुत्र पाहिले. पण आपल्या पसंतीस कोणीच उतरला नाहीं. अन् हा सत्यवानच आपल्या पसंतीला उतरला तर ?–' असा विचार करीत करीतच ती रथांतून उतरली. आणि प्रधानाच्या मागोमाग चालूं लागली. त्या दाट जंगलांतून वांकडीं तिकडीं वळणें घेत तीं दोघें बरींच पुढें गेलीं. हळूहळू त्यांना दुरूनच एक आश्रम दिसूं लागला.

'–सत्यवानच आपल्या पसंतीला उतरला तर ?' सावित्रीचे विचार चालूच होते. ' पण तो तर नुसता नांवाचा राजपुत्र. त्याच्याजवळ ना राज्य ना सत्ता. रानांतल्या झोंपडींत राहून आईवडिलांचें पोट भरणारा.–पण राज्यावर नि संपत्तीवर काय आहे ? आपल्याला गुण हवे आहेत. मनाचा मोठेपणा हवा आहे...'



इतक्यांत तीं दोघें आश्रमापाशीं येऊन पोहोंचलींसुद्धां. पलीकडच्या बाजूनें एक तरुण चाललेला तिनें पाहिला. त्याच्या खांद्यावर कुऱ्हाड होती आणि हातांत दोरी होती. तो रानांत लांकडें तोडायला जातांना दिसत होता. मात्र त्या तरुणाची चालण्याची ऐट आणि अंगावरचें तेज कांहीं वेगळेंच सांगत होतें. चतुर सावित्रीनें ताडलें कीं हाच तो सत्यवान असला पाहिजे.

मंत्री सावित्रीसह आश्रमांत आला. आंधळ्या द्युमत्सेनाला त्या दोघांनीं नमस्कार केला. द्युमत्सेनाच्या म्हाताऱ्या बायकोनें त्यांचें स्वागत केलें. आश्रमांत गाडग्यामडक्यांचाच संसार दिसत होता. राज्य गमावून रानांत येऊन पडलेला राजा ! त्याच्यापाशीं दुसरें काय असणार ? तरी पण स्वभावाचें सौजन्य मात्र त्याच्यापाशीं भरपूर होतें. तें त्याच्या म्हाताऱ्या बायकोपाशींहि होतें. प्रधानानें सावित्रीची ओळख त्यांना करून दिली. आणि सुशील सावित्रीनें तो सारा दिवस त्या दोघांच्या सेवेंतच घालविला.

म्हातारीं राजाराणी सावित्रीच्या प्रेमळ वागण्यानें अगदीं प्रसन्न झालीं. द्युमत्सेनाला मागची आठवण झाली. द्युमत्सेन त्यावेळीं राज्य करीत होता. सावित्री लहान होती. द्युमत्सेनाची सावित्रीच्या वडिलांशीं म्हणजे अश्वपति राजाशीं मैत्री होती. तेव्हां आपल्या सत्यवानाचें सावित्रीशीं लग्न व्हावें असें त्याच्या मनानें घेतलें होतें. परंतु पुढें त्याच्यावर वनवासाची पाळी आली. त्यामुळें अर्थातच तो विचार त्यानें आपल्या मनांतून काढून टाकला.

आज ती सावित्रीच प्रत्यक्ष त्याच्यासमोर येऊन उभी राहिली होती. प्रधानानें तिची ओळख करून देतांना सांगितलें होतें कीं, 'सावित्री आपला पति निवडायला निघालेली आहे.' द्युमत्सेनाला फार वाईट वाटलें. 'सावित्रीसारखी सद्गुणी सून आपल्याला मिळाली असती तर किती बरें झालें असतें !' असेंहि त्याच्या मनांत येऊन गेलें.

दुपार झाली तेव्हां सत्यवान रानांतून लांकडें तोडून परत आला. आज स्वयंपाक सावित्रीनेंच केला होता. सावित्रीनेंच सर्वांना जेवायला वाढलें. आतां सावित्रीनें सत्यवानाला अगदीं जवळून बघितलें.

तो वागतो कसा, बोलतो कसा, वनवासांत असतांनाहि तो आपल्या आईवडिलांची सेवा किती मनापासून करतो. हें सगळें तिला समजलें. हळूहळू तिच्या मनांत एक विचार पक्का होऊं लागला–' हाच आपला पति व्हावा, सत्यवानच आपला पति व्हावा.'

आणि दुसऱ्या दिवशीं सावित्री तिथून परत निघाली, ती तसा निश्चय करूनच. तिनें प्रधानाला सांगितलें, " आतां आपण आपल्या घरींच परतायचें. आपलें काम झालें आहे."

✦ ✦ ✦

## सावित्रीचा दृढ निश्चय

आपली आवडती मुलगी प्रधानासह परत आलेली पाहून अश्वपति राजाला केवढा आनंद झाला ! राजा उच्चासनावर बसला होता. नुकतेच नारदमुनीहि हिंडत हिंडत तिथे येऊन पोहोंचले होते. त्यांचें स्वागत करून राजा त्यांच्याशीं सावित्रीबद्दलच बोलत होता. एवढ्यांत स्वतः सावित्रीच त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली.

सावित्रीनें शालीनपणानें नारदांना नमस्कार केला. आणि मग वडिलांनाहि नमस्कार केला. " बाळ, आलीस तूं परत ? " अश्वपति राजानें तिला प्रेमानें विचारलें.


" तुझी निवड झालीच असेल. मग कळूं दे तरी आम्हांला," तेवढ्यांत नारदमुनी हंसत हंसत म्हणाले.

मग मात्र सावित्री लाजून खालीं पाहूं लागली. तेव्हां प्रधानच सांगूं लागला. " महाराज, आम्ही पुष्कळच राज्यांतून हिंडलों. परंतु राजकन्येला तिथला कोणीच राजपुत्र पसंत पडला नाहीं. अखेर परत येत असतांना मी द्युमत्सेन राजाच्या समाचारासाठीं थांबलों. तिथे द्युमत्सेनाचा मुलगा सत्यवान राजकन्येच्या दृष्टीला पडला. आणि तिथेच राजकन्येचें काम झालें !–"

" काय द्युमत्सेन ?–म्हणजे राज्य गमावून वनवासांत गेलेला द्युमत्सेन ?" अश्वपति राजानें प्रधानाला पुरतें बोलूं न देतांच विचारलें.

" होय महाराज, शाल्व देशचा माजी राजा द्युमत्सेन. आपले स्नेही आहेत ते. " प्रधान पुढें सांगूं लागला. पण राजाचें त्याच्या

सांगण्याकडे लक्षच नव्हतें. 'आंधळ्या, राज्यहीन राजाच्या मुलाशीं सावित्री लग्न करणार?' त्याला तो विचारच पटेना. अखेर त्यानें सावित्रीलाच विचारलें, "बाळ, हीच तुझी निवड आहे का? सत्य-वानालाच तूं वरलें आहेस का?"



सावित्रीनें मान हालवून होकार दिला. आणि एकदम तिचें लक्ष नारदांकडे गेलें. सत्यवानाचें नांव ऐकल्याबरोबर त्यांचा चेहरा एकदम गंभीर झाला होता. तरी सावित्रीनें त्यांच्याकडे पाहात विचारलें, "मुनिश्रेष्ठ, माझी निवड बरोबर आहे ना?"

"नारायण, नारायण," नारद अधिकच गंभीर होऊन म्हणाले, "मुली, तुझी निवड बरोबर आहे खरी; पण ती धोक्याची आहे." आणि मग एकदम राजाकडे वळून ते म्हणाले, "राजा, तुझ्या कन्येनें दुसरा पति निवडलेला बरा. सत्यवान रूपानें अति सुंदर आहे. तसाच तो सर्वगुणसंपन्न आहे. हें मलाहि माहीत आहे. तरी पण सावित्रीनें त्याला वरूं नये."

नारदांच्या या उत्तरानें राजा व सावित्री दोघेंहि बुचकळ्यांत पडलीं. सत्यवानापाशीं सारे सद्गुण आहेत, मग त्याला कां वरूं नये ? त्यांना या बोलण्याचा नीट अर्थच कळेना. तेव्हां सावित्रीनें म्हटलें, " पण महाराज, माझा निश्चय अगोदरच झालेला आहे. एकदां एकाला पति म्हणून वरल्यानंतर आर्य स्त्रीला दुसऱ्याचा विचार तरी कसा करतां येईल ? आणि माझ्या दृष्टीला तरी सत्यवानांत कांहींच दोष दिसत नाहीं. "

" तें खरें आहे." नारद सांगूं लागले, " पण तुला पुढलें भविष्य माहीत नाहीं म्हणून तूं असें म्हणतेस. तें मला ठाऊक असल्यामुळें मी तुला नको म्हणतों आहें."

" काय, काय भविष्य आहे पुढलें, मुनिवर ? " राजानें अधीरतेनें विचारलें.

" राजा, सत्यवानाचें आयुष्य आणखी फक्त एक वर्षभरच आहे," नारदांनीं गंभीरपणें सांगितलें.

नारदांनीं सावित्रीला खूप समजावून पाहिलें. राजानें व प्रधानानेंहि तिला उपदेश केला. परंतु तिनें सांगितलें कीं, " माझा निश्चय एकदां ठरला तो ठरला. त्यांत आतां कधींच बदल होणार नाहीं. आतां प्रत्यक्ष इंद्र मला पति म्हणून मिळाला तरी नको. मी विवाह करीन तो सत्यवानाशींच. "

अखेर अश्वपतीचा नाइलाज झाला. त्यानें सावित्रीच्या लग्नाची तयारी केली. आणि सर्व वऱ्हाड घेऊन तो द्युमत्सेन वनवासांत होता त्या आश्रमाकडे निघाला.

✦ ✦ ✦

## लग्न लागलें

सत्यवानाचा सबंध दिवस आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांची सेवा करण्यांतच जात असे. लहानपणी राजवाड्यांत तो किती सुखांत वाढलेला होता. दास-दासी त्याच्या सेवेला सारख्या हजर होत्या. तो मनांत आणील ती वस्तु त्याच्या पुढ्यांत येऊन पडत होती. अंगावर रेशमी उंची वस्त्रें सळसळत होतीं आणि सोन्यामोत्याचे दागिने

रुळत होते. सत्यवान लहान होता तेव्हां त्याला घोड्यांची फार आवड. त्यावरून त्याचें नांवहि ' चित्राश्व ' असें पडलेलें होतें.

पण आज मात्र त्याला पायींच चालावें लागत होतें. आज मात्र तो अरण्यांत त्या झोपडींत येऊन राहिला होता. आश्रमांतलीं सारीं कामें त्यालाच करावीं लागत होतीं. दूर रानांत जाऊन लांकडें तोडून आणणें. लांब झऱ्यावर जाऊन पाणी भरून आणणें. झोपडीची झाड-लोट करून ती स्वच्छ ठेवणें. सारें सारें त्यालाच करावें लागत होतें. आणि तें सारें तो अगदीं आनंदानें करीत होता. तें करण्यांत त्याला समाधान होतें.

सत्यवान होताच तसा गुणी. त्याचे वडील सत्यवचनी, आई सत्यवचनी; आणि त्याला स्वतःला खोटें बोलणें तर कधीं माहीत नव्हतें. यावरून त्याचें नांव ' सत्यवान ' पडलें होतें. कामचुकारपणा त्याच्या गांवींहि नव्हता. प्रत्येकाशीं गोड बोलावें. होईल ती त्याची सेवा करावी. हाच त्याचा स्वभाव. आणि सद्गुणी सावित्रीनें सत्य-वानाची निवड केली होती ती त्याच्या याच गुणीपणामुळें. मात्र सावित्रीनें आपल्या विचाराचा पत्ताहि त्याला लागूं दिला नव्हता.

सावित्री तिथे येऊन गेल्यापासून सत्यवानाच्या मनाला चुट-पूट लागून राहिली होती. परंतु ती कधीं परत येऊन आपल्याला भेटेल अशी त्याला मुळींच आशा नव्हती. 'आपण गरीब होऊन अर-ण्यांत पडलेलों. सावित्री राजाची कन्या दूर मद्रदेशांत राहणारी. कशाला तिची-आपली पुन्हां भेट व्हायला !' असे विचार त्याच्या मनांत येत. त्यामुळें एक दिवस सावित्री प्रत्यक्ष त्याच्या आश्रमाच्या दाराशींच येऊन उभी राहिली तेव्हां तो अगदीं चकित झाला.

अश्वपती राजानें पुढें होऊन आंधळ्या द्युमत्सेनाला नमस्कार केला. अश्वपतीची ओळख पटतांच द्युमत्सेनानेंहि त्याला आसन देऊन त्याची खुशाली विचारली. अश्वपतीबरोबर त्याची मुलगी आणि बरेंच मोठें वऱ्हाडहि आलें होतें. द्युमत्सेनाला हें समजतांच तो गोंधळांत पडला. एवढें वऱ्हाड व मुलगी घेऊन राजा इकडे अरण्यांत कोणीकडे आला ? त्याला कांहीं उमज पडेना. अखेर त्यानें राजालाच विचारलें.

" राजा, हा एवढा लवाजमा घेऊन आपली स्वारी इकडे कोणीकडे निघाली आहे ? "

" कोणीकडे म्हणजे ? आपल्याकडेच. आपल्या आश्रमांतच." अश्वपतीनें उत्तर दिलें.

" माझ्याकडे ? अन् तें कशासाठीं ? " द्युमत्सेनानें आश्चर्यानें विचारलें.

तेव्हां सावित्रीला पुढें बोलावून अश्वपतीनें सांगितलें, " ही माझी मुलगी सावित्री. आपल्या पदरांत घालण्यासाठीं आणली आहे."

द्युमत्सेनाचा राजाच्या या सांगण्यावर विश्वासच बसेना. तो म्हणाला, " मी तिला पदरांत कशी घेणार ? मी पडलों अरण्यवासी."

तेव्हां मात्र अश्वपतीनें सरळच सांगून टाकलें, " द्युमत्सेन, आपल्या सत्यवानाला सावित्रीनें वरलें आहे. आणि त्या विवाहसमा-रंभासाठींच आम्हीं सर्वजण इथे आलों आहोंत. "

" छे, छे. राजा, " म्हातारा द्युमत्सेन त्याला अडवीत म्हणाला, " हें कसें शक्य आहे ? आम्ही रानांत राहून कसेबसे दिवस कंठीत असतों. आणि तुझी सावित्री राजवाड्यांत राहणारी राजकन्या. असें असतांना हें लग्न कसें शक्य आहे ? "

" तें शक्य कीं अशक्य हा प्रश्नच नाहीं. सावित्री जाणती अन् विचारी मुलगी आहे. तिनें आपल्या मनानें ही निवड केलेली आहे. तिला सगळी परिस्थिति डोळ्यासमोर दिसतेच आहे. तेव्हां तिला त्यांतहि सुखच वाटेल. तिला ज्यांत सुख त्यांत आम्हांलाहि सुख. " अश्वपतीनें समजावून सांगितलें.

मग मात्र आंधळ्या द्युमत्सेनाच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. सावित्री त्यापूर्वीं एकच दिवस त्यांच्या आश्रमांत राहून गेली होती. त्या वेळींच त्या दोघां नवराबायकोंना ती चटका लावून गेली होती. आतां तर ती आपली सून म्हणून इथे येऊन राहणार, या कल्पनेनें म्हाताऱ्या द्युमत्सेनाला मोठा हर्ष झाला.

सावित्रीचें सत्यवानाशीं मोठ्या थाटामाटानें लग्न झालें. सावि-त्रीला मनासारखा पति मिळाला म्हणून ती आनंदली. सत्यवानालाहि आपल्याला उत्तम पत्नी लाभली म्हणून बरें वाटलें.

लग्नसमारंभ आटोपला. वऱ्हाडी मंडळी परतली. राजा अश्वपतीनें मुलीचा निरोप घेतला आणि तो परत जायला निघाला. पण त्याच्या मनांत नारदांनीं सांगितलेलें भविष्य सारखें डोकावत होतें. '–आपल्या जावयाचें, सत्यवानाचें पुढें काय होणार ?'

✦ ✦ ✦

## तो दिवस !

सावित्री सासरचा सर्व संसार स्वतःच करूं लागली. आपल्या प्रेमळ वागणुकीमुळें ती सासूसासऱ्यांना फार आवडूं लागली. ती त्यांची सर्व प्रकारें सेवा करी. नवऱ्यावर तर तिचें अतिशयच प्रेम होतें. त्यामुळें अरण्यांतल्या झोपडींत राहूनहि ती आनंदी होती. राजाच्या अलोट श्रीमंतींतून ती झोपडींतल्या गरिबींत आली होती. पण तरीहि तिला त्यांत समाधान होतें.

आणि असें हां हां म्हणतां वर्ष होत आलें. सावित्री सर्व कामधाम करीत होती. सर्वांशीं आनंदानें वागत होती. तरी तिच्या मनांत एक गोष्ट सारखी डाचत होती. ती म्हणजे नारदांनीं सांगितलेलें भविष्य–' सत्यवानाचें आयुष्य एका वर्षानंतर संपेल ' असें तें भविष्य होतें. त्याबद्दल सावित्रीला सारखी काळजी लागलेली होती. तिच्या लक्षांत आलें कीं, नारदांनीं सांगितलेलें वर्ष भरत आलें. महामुनि नारदांचें बोलणें कधींच खोटें होत नाहीं. म्हणून तिनें एक व्रत सुरू केलें.



सावित्री तीन दिवस उपाशी राहिली. तिनें 'सावित्री' देवतेला प्रार्थना केली कीं, " हे देवी, मला उदंड सौभाग्य मिळो. माझ्या पतीला पुष्कळ वर्षेंपर्यंत आयुष्य लाभो." तीन दिवस उपवास करून ती सावित्रीदेवीचें स्मरण करीत राहिली. चवथा दिवस उजाडला. हाच दिवस सत्यवानाच्या मरणाचा दिवस होता. त्या दिवशीं एक वर्ष पुरें होऊन त्याचें आयुष्य संपत होतें. तरीहि सावित्री घाबरली नाहीं.

तिनें त्या दिवशीं आपल्या पतीबरोबर अरण्यांत जायचें ठरविलें. ती म्हणाली, "मला आज वनशोभा पहावीशी वाटते. मी आज तुमच्याबरोबर अरण्यांत येतें." सत्यवान लांकडें तोडून आणण्यासाठीं अरण्यांत निघाला होता. तेव्हां सावित्री सासूसासऱ्यांकडे परवानगी मागायला गेली. सासरा म्हणाला, "बाळ, गेले तीन दिवस तूं व्रत करीत आहेस, उपाशी आहेस. तेव्हां आज तुझ्या व्रताचें पारणें करून मग जा."

पण सावित्रीनें सांगितलें कीं, "मी परत येऊनच पारणें करीन. रात्रीं चंद्रोदय झाल्यानंतर पारणें करावें अशी माझी इच्छा आहे." तेव्हां सासूसासऱ्यांनीं तिला सत्यवानाबरोबर जायची परवानगी दिली.

तीं दोघेंहि बोलत बोलत अरण्याकडे निघालीं. वृक्षवेली फुलल्या होत्या. हरणांचे कळप धांवत होते. ती शोभा पाहात दोघें चाललीं होतीं. सत्यवान आनंदांत होता पण सावित्री मात्र मनांतून फार दुःखी झाली होती. सत्यवानाच्या मरणाचा दिवस आज आहे हें तिला माहीत होतें. पण सत्यवानाला मात्र त्याची कांहींच कल्पना नव्हती. त्यामुळें तो



नेहमींप्रमाणें लांकडें तोडूं लागला. बरींच लांकडें तोडून झालीं. सूर्य अस्ताला चालला. तरीसुद्धां सत्यवान एका वडाच्या झाडावर चढला आणि आणखी लांकडें तोडूं लागला. पण इतक्यांत त्याचें डोकें भयंकर दुखूं लागलें. त्याच्या अंगांतली शक्ति जाऊन त्याचें अंग एकदम थरथर कांपूं लागलें.

सावित्री त्या वडाच्या झाडाखालींच बसली होती. सत्यवान घाईघाईनें खालीं उतरला. त्यानें सावित्रीला सांगितलें " माझ्या डोक्यांतून भयंकर कळा निघताहेत." सावित्री समजली कीं, हीच ती आपल्या नवऱ्याच्या मरणाची वेळ. तिनें लगेच सत्यवानाचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें. इतक्यांत रात्र पडली. कोणीतरी एक धिप्पाड पुरुष त्या वडाखालीं येऊन उभा राहिला. तो अत्यंत तेजस्वी दिसत होता. त्याचा रंग काळसर पिंगट होता. त्याच्या एका हातांत गदा व दुसऱ्या हातांत फांस होता. आणि तो रेड्यावर बसून आला होता. सावित्रीनें न घाबरतां त्याला विचारलें, " फार भयंकर दिसणारे असे आपण कोण आहांत ? आपण इथे कशासाठीं आलां आहांत ? "

" मला यमधर्म म्हणतात, " तो भयंकर दिसणारा पुरुष सांगूं लागला. " तुझ्या नवऱ्याचें आयुष्य संपलें आहे. त्याला घेऊन जाण्यासाठीं मी आलों आहें. तेंच माझें काम आहे. आणि तुझा नवरा धर्मानें वागणारा व सद्‌गुणी आहे. त्यामुळें मी माझे दूत न पाठवितां स्वतःच त्याला नेण्याकरितां आलों आहें."

असें बोलतां बोलतांच यमानें हातांतला फांस सत्यवानाच्या शरीरावर टाकला. त्याचे प्राण त्यानें ओढून घेतलें. आणि त्यानें आपला रेडा दक्षिणेकडे हांकला.

✦ ✦ ✦

## यमधर्महि हरला

सत्यवानाच्या शरीरांतून प्राण निघून गेल्याचें सावित्रीला



समजलें. परंतु तरीहि तिनें धीर सोडला नाहीं कीं ती बावरली नाहीं. ती पुण्यवान असल्यामुळें यमधर्म परत चाललेला तिला दिसला. लगेच तीहि उठून यमाच्या मागोमाग निघाली. व्रत करीत असल्यामुळें तीन दिवसांची ती उपाशी होती. तरीहि न थकतां ती भराभर यमाच्या मागें चालूं लागली. तें लक्षांत येतांच यम म्हणाला, " बाळ, तूं आतां घरीं परत जा. तूं तुझ्या नवऱ्याची शक्य होती तेवढी सेवा उत्तम प्रकारें केलेली आहेस. तेव्हां तूं त्याच्या ऋणांतून आतां मुक्त झाली आहेस. तेव्हां तूं आतां परत फीर."

परंतु सावित्री चालतच राहिली. ती स्वधर्मानें चालणारी होती. तिनें सासूसासऱ्यांची उत्तम सेवा केलेली होती. ती आपल्या नवऱ्यावर मनापासून प्रेम करीत होती. आणि तिनें आदल्या तीन दिवसांपासून व्रत केलेलें होतें. या तिच्या पुण्यामुळें तिला कोणी अडवूं शकत नव्हतें. यमधर्माबरोबर थोडी पुढें गेल्यावर ती म्हणाली, " महाराज, सज्जनाबरोबर सात पावलें चाललें तरी त्याची मैत्री घडते. तसें आपलें मित्रत्व मला लाभलें आहे असें समजून, मी आपल्याला कांहीं सांगतें. तें कृपा करून ऐकून घ्या. मन जिंकलेले अनेक मुनी वनांत राहून धर्मानें व सत्यानें वागतात, त्यासाठीं खूप श्रमहि करतात. त्यामुळें धर्म हाच श्रेष्ठ आहे असें संत सांगतात."

सावित्रीचें तें मधुर व शहाणपणाचें बोलणें ऐकून यमधर्म प्रसन्न झाला. त्यानें तिला म्हटलें, " तुझ्या बोलण्यानें मी संतुष्ट झालों आहें. तुझ्या नवऱ्याच्या प्राणांशिवाय तूं कोणताहि वर मागून घे."

तेव्हां सावित्रीनें 'आपल्या सासऱ्याचें आंधळेपण जावें' असा वर मागून घेतला. तो वर देऊन यम म्हणाला, " आतां तूं माघारीं जा. तूं आतां फार दमली आहेस."

परंतु त्याकडे लक्ष न देतां सावित्री म्हणाली, " हे देवश्रेष्ठा, सत्पुरुषाची संगती कधीं फुकट जात नाहीं. म्हणून नेहमीं साधूच्या संगतींत राहावें तें चांगलें."

यमानें तें ऐकलें तेव्हां त्याला सावित्रीच्या बुद्धीचें मोठें कौतुक वाटलें. पुन्हां त्यानें तिला नवऱ्याच्या प्राणांशिवाय दुसरा कोणताहि वर मागायला सांगितलें. तेव्हां तिनें ' सासऱ्याचें गेलेलें राज्य परत



मिळावें व तो नेहमीं धर्मानेंच चालत राहावा ' असा वर मागितला. यमानें तोहि वर तिला देऊन टाकला.

तरीहि सावित्री यमाच्या मागून जातच होती. ती यमाला म्हणाली, " वागण्यानें, मनानें व बोलण्यानेंहि सत्पुरुष कोणाला दुखवीत नाहींत. उलट सर्वांविषयीं प्रेम ठेवून त्यांना शक्य होईल तें दान देणें हेंच सत्पुरुषांना योग्य असतें."

यमधर्माला तिच्या या लाघवी बोलण्यानें बरें वाटलें. आणि त्यानें तिला नवऱ्याच्या प्राणांशिवाय आणखी एक वर मागावयास सांगितलें. तेव्हां सावित्रीनें 'आपल्या वडिलांना शंभर मुलगे व्हावेत' असा तिसरा वर मागून घेतला.

आणि तरीहि सावित्री यमाच्या मागोमाग चाललीच होती. ती पुन्हां त्याला म्हणाली, " यमराज, आपल्या सत्तेमुळें सर्व लोक स्वधर्मानें चालतात म्हणून आपल्याला यमधर्म म्हणतात. साधुपुरुषा-प्रमाणें आपण निष्कपटी व विनयी आहांत. आणि माणसें स्वतः-पेक्षांहि यामुळेंच साधूवर विशेष विश्वास ठेवतात. "

यमधर्म सत्यवानाचे प्राण घेऊन पुढें चालला होता. परंतु मागून येत असलेल्या सावित्रीच्या सुंदर बोलण्याकडे त्याचें लक्ष होतें. त्यामुळें त्यानें संतुष्ट होऊन तिला नवऱ्याच्या प्राणांशिवाय आणखी एक वर मागावयास सांगितलें. तेव्हां सावित्री चटकन् म्हणाली कीं, " मला सत्यवानापासून शंभर मुलगे व्हावेत."

यमधर्म तिच्या मधुर बोलण्यानें गुंग झाला होता. त्यामुळें त्याला भान न राहून त्यानें म्हटलें, " ठीक आहे. तसें होईल. पण आतां मात्र तूं फारच दूर आली आहेस. तेव्हां आतां माघारी जा कशी."

तेव्हां सावित्री म्हणाली, " थोर पुरुषांनीं दिलेला वर कधींच खोटा होत नाहीं." त्यानंतर तिनें साधुपुरुष कसे थोर मनाचे असतात याचें सुंदर वर्णन केलें. तें ऐकून तर यम फारच प्रसन्न झाला. आणि म्हणाला कीं, " तुझ्या या बोलण्यामुळें मला तूं फारच आवडूं लागली आहेस. तेव्हां तुला हवा तो उत्तम वर माझ्यापासून मागून घे पाहूं."

त्याबरोबर सावित्रीनें चटकन् तिला हवा होता तोच वर मागितला. ती म्हणाली, " महाराज, सत्यवान जिवंत व्हावा हाच वर मी मागत्यें. कारण माझ्या पतीचे प्राण तुम्ही परत द्याल तेव्हांच तुमचें पहिलें वचन खरें होईल."

हें ऐकल्यावर मात्र यमाच्या लक्षांत आलें कीं, आपण चांगलेच पकडलें गेलों. आतां त्याचा नाइलाजच झाला. तेव्हां यम सावित्रीला घेऊन परत त्या वडाच्या झाडापाशीं आला. हंसत हंसत त्यानें सत्यवानाचे प्राण परत त्याच्या शरीरांत सोडून दिले. आणि मोठ्या आनंदानें सावित्रीला व सत्यवानाला हातीं धरून आशीर्वाद दिला.



यम म्हणाला, “ आतां तुम्ही सुखानें नांदा. सत्यवानाला चारशें वर्षांचें आयुष्य मी दिलेलें आहे. त्याला आरोग्य व तारुण्यहि लाभेल.”

असें म्हणतां म्हणतांच यम गुप्त झाला आणि सावित्री सत्यवानासह आपल्या आश्रमांत परत येण्यास निघाली.

✦ ✦ ✦

## हीच ती वटपौर्णिमा

सावित्रीनें नवऱ्याला खूप आयुष्य लाभावें म्हणून व्रत केलें होतें. त्याप्रमाणें तिचा मेलेला नवराहि जिवंत होऊन त्याला खूप आयुष्य लाभलें. इतरहि अनेक चांगल्या गोष्टी तिच्या मनाप्रमाणें झाल्या. शेवटीं वडाच्या झाडाखालींच तिचा पति तिला परत मिळाला. तेव्हांपासून सावित्रीची आणि वडाचीहि पूजा करण्याची पद्धत सुरू झाली. हेंच व्रत ‘ वटसावित्री ’चें व्रत म्हणून प्रसिद्ध झालें. सावित्रीला वर मिळाला तो दिवस ज्येष्ठी पौर्णिमेचा होता, म्हणून ‘वट-पौर्णिमा’ या नांवानें ही पौर्णिमा ओळखली जाऊं लागली.



IRBK-0106941

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...६९८१ नों. दि ..........
वि. ... क्र. ..........